Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.I/ Feb; 12pp.1-4 प्रा.डॉ. एस.टी. कुटे ISSN:-2230-7850

Research Papers

# मानवी हक्क – सेझ आणि बालकामगार

प्रा.डॉ. एस.टी. कुटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर
जि. बुलडाणा. मो. 9420182516

## प्रस्तावना :–

मानवी हक्क ही संकल्पना विसाव्या शतकात प्रचलीत झाली असली तरी या संकल्पनेचे मुळ ग्रीक काळात आढळते. प्लोने स्त्री – पुरूश समानतेचा विचार मांडला होता. तर ॲरिस्टॉटलने नागरीकांच्या हक्काचे विवेचन केले होते. अर्थात त्यांच्या संकल्पनांची व्याप्ती मर्यादीत होती. जॉन लॉक या विचारवंताने सर्वप्रथम मर्यादीत राजेशाही व मुलभूत स्वातंत्राची आवश्यकता आपल्या भाशणातून मांडली. त्यानंतरच्या काळात पाश्चात्य जगातील विविध घडामोडीतून या संकल्पनेचा विस्तार व विकास झाला.

इसवी सन 1688 मधील ग्लोरीअस कांती 1776 मधील अमेरिकन राज्यकांती, 1789 ची फ्रेंच राज्यकांती, 1791 मधील हक्कांचे विधेयक अशा अनेक टप्प्यातून मानवी हक्क संकल्पनेचा प्रसार झाला. स्वातंत्र, समता आणि बंधुता ही समाज जिवनाची मुलभूत तत्वे संपूर्ण मानव समाजाला 1789 सालच्या फ्रेंच राज्यकांतीने मिळवून दिली. आणि राजा, सरजामदार आणि धर्मगुरू यांच्या अनिर्बंध सत्तेला आळा घातला. यानंतरही संपूर्ण जगभर होणा–या आंतरराश्ट्रीय पातळीवरील सभा आणि सम्मेलनाच्या माध्यमातून मानवी हक्कांची संकल्पना प्रखरतेने मांडण्यात आली. उदा. बर्लिन कॉंग्रेस, बुसेल्स सम्मेलन 1899, हग संम्मेलन इत्यादी. इ.स. 1929 साली आंतरराश्ट्रीय विधी संस्थेकडून आंतरराश्ट्रीय मानवी हक्काची घोशणा करण्यात आली. पहिल्या आणि दुस–या महायुध्दानंतर संपूर्ण मानव समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. या दृश्टीने 1945 साली जागतिक शांततेसाठी स्थापन झालेल्या संयुक्त राश्ट्र संघाच्या सनदेमध्ये मानवी हक्कांना प्रमुख स्थान देण्यात आले. त्यानंतर 10 डिसेंबर 1948 साली संयुक्त राश्ट्रसंघाने मानवी हक्काची घोशणा केली. म्हणून दरवर्शी 10 डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात एकूण तीस कलमे आहेत. संयुक्त राश्ट्राच्या सनदेच्या सरनाम्यात अन्य सहा कलमांमध्ये कलम – 1, 55, 56, 62, 68, 76 मानवी हक्कांचा उल्लेख आहे. या कलमामधून व्यक्त झालेला मानवी हक्कांचा जाहीरनामा विस्तारीत स्वरूप धारण करतो. या कलमासहीत संयुक्त राश्ट्राच्या आमसभेने दिनांक 10 डिसेंबर 1948 रोजी हा जाहीरनामा स्विकारला व त्यानंतर मानवी हक्क संकल्पनेला आधुनिक स्वरूप लाभले.

### मानवी हक्क : अर्थ व स्वरूप

1948 नंतर जागतिक पातळीवर मानवी हक्क संकल्पना व व्यवहार प्रचलीत होत गेले. मानवी हक्काच्या संरक्षणाविशयी संवेदनशील असणा–या राश्ट्रापैकी भारत एक आहे. भारतातील राश्ट्रीय स्वातंत्राच्या काळातच मुलभूत अधिकार प्रत्येकाला असावे ही संकल्पना अस्तित्वात होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत मुलभूत अधिकार व त्यावरील मर्यादा, भाग – 3 मध्ये अंतर्भूत केले आहे. या घटनात्मक मुलभूत अधिकारांच्या यादीत जे अधिकार नमुद आहेत ते सर्वच मानवाधिकार आहेत. मानवाधिकारात सर्वात महत्वाचा अधिकार म्हणजे जगण्याचा अधिकार होय. कारण माणूस जगला तरच स्वतःचा व समाजाचा विकास करील. चांगले जिवन जगण्याकरीता ज्या ज्या गोश्टी आवश्यक असतात त्या त्या गोश्टी प्राप्त करणे हा प्रत्येक माणसाचा मानव अधिकार आहे. भारत हे विकसानशील राश्ट्र असल्यामुळे आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या योजना तयार करतांना मानवी हक्काच्या संरक्षणाला प्राधान्य दिले जाते. भारतीय न्याय व्यवस्था सुध्दा याबाबत अतिशय दक्ष आहे. 1993 मध्ये भारतात मानवी हक्क संरक्षण कायदा तयार करून मानवी हक्क आयोगाची राश्ट्रीय व राज्य पातळीवर स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या माध्यमातून व्यक्तीला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय संविधानाच्या 124 व्या कलमान्वये न्यायालयाची निरपेक्षता जोपासल्या गेलेली आहे.

व्ही.एन. गाडगीळ यांच्या मते मानवी हक्क मानवाला आत्मसन्मान व स्वातंत्र देतो. ते संस्कृती व देशपरत्वे बदलत नाहीत. रूझवेल्ट यांचे मानवी हक्काबाबतचे विचार मौलिक आहेत. त्यांच्या मते कुटुंबातून मानवी हक्काचा उगम होतो. जर कुटुंबातून

Please cite this Article as : प्रा.डॉ. एस.टी. कुटे, 'मानवी हक्क – सेझ आणि बालकामगार : Indian Streams research Journal (Feb ; 2012)

मानवी हक्क जोपासले गेले तर त्या समाजात, देशात आणि संपूर्ण जगात मानवी हक्काचे पालन होईल. मानवी हक्क कोणीही भेट दिलेले नाहीत. प्रत्येक मानवाला ज्यावेळी त्याची आवश्यकता असेल तेंव्हा तो त्याचा उपयोग करू शकतो. असे जन्मतःच प्राप्त झालेले निसर्गदत्त अधिकार म्हणजे मानवी हक्क होय.

1990 मध्ये प्रसिध्द झालेल्या मानव विकास अहवालामध्ये मानवी हक्काचे महत्व अधोरेखीत झाले. भौतिक विकासाहून निराळया घटकांचाही विकास प्रक्रीयेत सहभाग असतो हे मान्य केले गेले. म्हणजेच विकासाचे ध्येय बाळगतांना केवळ भौतिकवादी दृश्टीकोण बाळगण्याऐवजी मानवतावादी दृश्टीकोण अंगीकारला गेला. 1999 च्या मानव विकास अहवालाने मानवी चेह–याचे जागतिकीकरण ही संकल्पना मांडली. प्रत्येक देशाची खरी संपत्ती म्हणजे त्या देशातील लोक असतात. विकासाचा हेतू या लोकांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हा असावा. म्हणजेच मानवाधिकार व मानवीहक्क जोपासून मानवी विकास घडविला पाहिजे.

मानवी हक्कांचे स्वरूप गुंतागुंतिचे आहे. या हक्काची निश्चित यादी करणे शक्य नाही. ही गतिमान संकल्पना आहे. ती देश काल परिस्थिती नुसार बदलते. सोप्या भाशेत मानव हक्क म्हणजे असे काही हक्क जे सर्वत्र, सर्वांकडून जोपासले जावेत. जन्माला आलेल्या प्रत्येक मानवाचा कुठल्याही अपवादाशिवाय असणारा जन्मसिध्द हक्क म्हणजे मानवी हक्क होय. मानव जन्मजात स्वतंत्र असतो व सर्वांना समान हक्क व अधिकार असतात. या सर्वमान्य गृहीतावर मानवी हक्क संकल्पना आधारीत आहे.

सेझ आणि मानवी हक्क –

भारताने 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरणाच्या रूपात एल. पी.जी. मॉडेलची घोशणा केली. सेझच्या निर्मितीमध्ये या धोरणाचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. विशेश आर्थिक क्षेत्राचा – सेझ – कायदा संसदेत 2005 मध्ये संमत झाला असला तरी त्याचे विधेयक आयात निर्यात धोरणाचा सुधार हया रूपात 2001 मध्येच मांडले गेले होते. त्याचा परिणाम स्वरूप महाराश्ट्र शासनाने 12 आक्टोबर 2001 रोजी शासन ठराव पारित करून सेझ निर्मितीचे पहिले पाउल टाकले. महाराश्ट्रातील पहिले सेझ नवी मुंबई येथे 2001 मध्ये सिडको मार्फत उभारण्यात आले. या प्रकल्प क्षेत्रात द्रोणागिरी, कळबोली, उनदेव व रिजनल पार्क झोन अशा चार विभागांचा समावेश करण्यात आला.

सेझची उद्दीश्टये :–

1. अर्थव्यवस्थेत औद्योगीक विकासाला चालना देणे.
2. निर्यात वाढविण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे.
3. देशात पायाभूत सुविधांचा विकास करणे.
4. परकीय गुंतवणूकदारांना आपल्या देशात गुंतवणूक करण्यासाठी आकर्शीत करणे.
5. देशाच्या आर्थिक विकासातील क्षेत्रीय असमतोल दूर करणे.
6. देशाला परकीय चलन मिळवून देण्यासाठी आंतरराश्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे.
7. रोजगार निर्मिती करणे.
8. देशातील पर्याप्त साधनसामग्रीचा वापर करणे.

उपरोक्त उद्देशावरून प्रथमदर्शी सेझचे संपूर्ण परिणाम अनुकूल असल्याचे भासत असले तरी वास्तव स्थिती मात्र त्यापेक्षा वेगळी आहे. भारत सरकारने जो विकासक मागणी करेल त्याला सेझ देण्याचा सपाटा लावला आहे. सेझ मागणारे विकासक अनावश्यक आकाराच्या अवाढव्य जमिनी मागत आहेत. त्यातून त्यांचे भविश्यात विकसीत जमिनीच्या आधारे नफेखोरी करण्याचे उद्देश दिसून येतात. आज देशात शेतक–यांच्या पिकावू जमिनी सरकार सक्तीने अधिग्रहीत करीत आहे. त्यातून सरकार विरूध्द शेतकरी असे संघर्श सुरू आहे. युनोच्या जाहीरनाम्यातील कलम 23 मधील रोजगारीच्या हक्काची तरतुद प्रत्येक व्यक्तीला आहे. परंतू भारतामध्ये विशेश आर्थिक क्षेत्र – सेझ – च्या रूपाने शेतक–यांच्या स्वयंरोजगारीवरच घाला घालण्याचे शडयंत्र आज मोठया प्रमाणावर दिसून येत आहे. कृशी व्यवसाय हा एक प्रकारचा स्वयंरोजगारच आहे. म्हणजे युनोच्या जाहीरनाम्यातील कलम 23 मधील रोजगारीच्या हक्कांची पायमल्ली होत आहे. शेतक–यांच्या सुपीक जमिनी हया सेझच्या नावाखाली घेवून विकासाला एक नवी दिशा देण्याची कामे अंमलात आणली जात आहे. अलीकडे राईट टू डेव्हलपमेंट – विकासाचा अधिकार – ही संकल्पना रूढ झाली आहे. परंतू विकास साध्य करतांना मानव हा केंद्रबिंदू माणून सर्वसमावेशक समान न्यायाचा विकास अंगीभूत असावा. जर विकास साध्य करतांना अनेक मानवी हक्कापैकी एका रोजगारीच्या हक्कांची अवहेलना होत असेल तर तो विकास हा एकांगी स्वरूपाचा राहील.

सेझ संबंधातील आतापर्यंतची वाटचाल बघता ज्या भागात पायाभूत सुविधांचा मुळातच विकास झाला आहे अशा भागातच सेझ निर्माण होत आहे. म्हणजेच सेझमुळे प्रादेशिक संतुलन निर्माण करण्यासाठी पुरक असणारे औद्योगीक, विकेंद्रीकरण होत नाही हे स्पश्ट आहे. सेझच्या बाबतीत रोजगार निर्माण होण्याची शक्यताही नाकारावी लागते. त्याबाबतीत दोन मुद्ये लक्षात घ्यावे लागतात. पहिला भाग असा की, विशेश आर्थिक क्षेत्र हे निर्यातप्रधान असल्यामुळे वस्तुचे उत्पादन करणारे जे कारखाने चालू होतील ते अति प्रगत उत्पादन तंत्रावर आधारीत असतील. त्याची उत्पादनाची पातळी उत्तम असेल अशा उद्योगात ॲटो मशिनरी अत्यंत प्रगत असेल. साध्या शब्दात सेझमधील कारखानदारी उत्तम उत्पादन करेल त्यासाठी कमाल प्रमाणात यंत्राचा वापर होईल. पण माणसाचा नाही. सेझमध्ये माहिती तंत्रविज्ञान संस्था असल्याने त्यांच्या बाबतीत जो रोजगार निर्माण होईल तो मुख्यत्वे उच्च प्रशिक्षीत लोकांसाठी असेल. शारीरिक कश्टाच्या कामगारांना तिथे कमी वाव राहील. त्यामुळे अकुशल श्रमिक स्वस्ताचा निर्माण होईल. जो कदाचित सुरक्षा कर्मचारी किंवा रखवालदार आणि स्वच्छता कर्मचारी यांच्यापुरताच मर्यादीत असेल. दुसरी महत्वाची बाब अशी की, सेझमधील कामगारांच्या बाबतीत पिळवणूकीची शक्यता मोठया प्रमाणावर वाढते. कारण सेझ अंतर्गत काम करणा–यांना देशातील कामगार कायदे लागू होत नाही. सर्व औद्योगीक विवाद औद्योगीक न्यायालय व कामगार आयुक्तांच्या कक्षेबाहेर असतील. त्यामुळे कामगारांचे शोशण अटळ आहे.

सेझ प्रकल्पांतर्गत निर्माण होणारी बहुतांशी उत्पादने भारतातील लघु उद्योग क्षेत्रांशी निगडीत अशी आहेत. त्यामुळे सेझ प्रकल्पाच्या उभारणीमुळे अगोदरच संकटात असलेल्या भारतीय लघु उद्योग आणखी अडचणीत येण्याची शक्यता आहे. सेझ अंतर्गत उद्योगांना सर्व सवलती द्यावयाच्या आणि त्या व्यतिरिक्त देशातील इतर उद्योजकांना त्या सवलतीपासून वंचीत ठेवावयाचे हे सर्व अन्यायकारक आहे. सेझला स्वतंत्र आर्थिक दर्जा देणे म्हणजे समस्त देशवासीयांच्या समता व न्याय या मुलभूत हक्कावर गदा आणणे होय.

थोडक्यात –

सेझचे पालन करतांना देशातील नागरीकांच्या मुलभूत हक्कांची उपेक्षा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. ज्याअर्थी शंभर कोटीपेक्षा अधिक लोक या राश्ट्राच्या भुभागावर राहतात त्याअर्थी त्यांचा तेथील संसाधनावर मुलभूत हक्क आहे. प्रत्येक देशाने आत्मनिर्भलतेच्या तत्वावर स्वतःच्या गरजा भागविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. व त्यातून होणा–या विकासातून त्या त्या देशातील नागरीकांच्या मुलभूत हक्कांची जपवणूक केली पाहिजे. सेझच्या उभारणीसाठी ज्या जमिनीची निवड करावयाची ती जमिन खडकाळ, पडीत अशा स्वरूपाची असावी. ज्या शेतक–यांच्या जमिनी जाणार असतील त्या शेतक–यांच्या अपत्यांच्या रोजगाराची व्यवस्था सरकार व कंपन्यांनी संयुक्तपणे स्विकारावी व कारखान्यातील उत्पादनाचे स्वरूप पाहून तसे प्रशिक्षण त्या त्या

भागातील तरूणांना देण्याची व्यवस्था करावी. शेतक–यांनी सेझकरीता जमिनी देतांना त्या खंडाने द्याव्यात. जेणे करून सेझ जर अयशस्वी झाले तर शेतक–यांचा त्या जमिनीवरील हक्क कायम राहील व त्यांना त्या परत मिळविता येतील.

बालकामगार आणि मानवी हक्क –

भारतीय राज्यघटनेमध्ये कलम 21 अन्वये बालकांचे हित जोपासण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. मात्र या अंतर्गत जगण्याच्या अधिकारामध्ये केवळ भौतिकदृष्टया जिवन जगण्याचा अधिकार हा अभिप्रेत नसून जे जे मुद्दे उपस्थित होतात, उदा. मानवी प्रतिश्ठेसह जगणे, जिवनावश्यक बाबी मिळविण्याचा अधिकार इत्यादी अधिकार सुध्दा त्यामध्ये समाविश्ट होतात. भारतीय घटनेच्या कलम 23 अन्वये देह व्यापार, भिक्षा मागणे, वेठबिगारी, जबरदस्तीने श्रम करून घेणे हया बाबींना कायदेशीररित्या प्रतिबंधीत करण्यात आले असून कलम 24 अन्वये धोकादायक उद्योग व खाणी इत्यादीमध्ये 14 वर्शाखालील बालकांकडून काम करून घेण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. कलम 39 इ व फ मधील मार्गदर्शक तत्वानुसार श्रमीक, स्त्री, पुरूश व कोवळया वयाची मुले यांच्या क्षमतांचा गैरवापर होणार नाही, केवळ आर्थिक आवश्यकतेमुळे वय किंवा शारिरीक शक्ती यांना अयोग्य राहील अशा उद्योगांमध्ये काम करणे भाग पडणार नाही. तसेच मुले, तरूणांना विकासाच्या सर्व संधी प्राप्त व्हाव्यात व सर्व प्रकारच्या शोशणांपासून संरक्षण मिळावे असे निर्देशित केलेले आहे. कलम 51 ;इद्ध नुसार सर्व प्रकारचे आंतरराश्ट्रीय करार पाळण्याचे बंधन ठेवण्यात आले आहे. 1974 साली भारत सरकारने बालकांविशयीचे धोरण जाहीर केले ज्यामध्ये बालकांच्या सर्वांगिण विकासाची हमी देण्यात आली. बालकांच्या पूर्ण शारिरीक व मानसिक विकासाकरिता त्यांना जन्मापूर्वी व जन्मानंतर सर्व आवश्यक सुविधा, सेवा पुरविण्यात येतील. हळूहळू या सुविधांची व्याप्ती वाढविण्यात येईल जेणेकरून देशातील सर्व बालकांना त्यांच्या विकासाकरिता जास्तीत जास्त संधी उपलब्ध होतील.

बाल गुन्हेगारीचे प्रकरण चालविण्याकरिता ज्यूवेनाईल जस्टीस कायदा 2000 मध्ये संमत करण्यात आला असून या कायद्यानुसार 18 वर्श व त्याखालील व्यक्तींना बालगुन्हेगार म्हणून त्यांचे विरूध्द कार्यवाही करण्यात येते. याआधी ही वयोमर्यादा 16 वर्शे एवढी होती. 1997 साली संसदेमध्ये बालश्रमिकांबाबतचे राश्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले.

बालकामगारांचा अर्थ –

सन 1948 च्या अधिनियम क्रमांक 11 नुसार – ज्या व्यक्तीने तिच्या वयाची 14 वर्शे पूर्ण केलेली नाहीत अशी व्यक्ती म्हणजे बालक होय. ज्या व्यक्तीने तिच्या वयाची 14 वर्शे पूर्ण केलेली आहेत, परंतू 18 वर्शे पूर्ण केलेली नाहीत अशी व्यक्ती म्हणजे पौगंड होय. ज्या व्यक्तीने तिच्या वयाची 18 वर्शे पूर्ण केलेली आहेत अशी व्यक्ती म्हणजे प्रौढ होय. युनायटेड स्टेटस् नॅशलन चाईल्ड लेबर कमिटीचे चेअरमन होमर फोक यांनी बालकामगारांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

१बालकामगार म्हणजे मुलांनी केलेले असे कोणतेही काम की, ज्यामुळे त्याच्या पूर्ण शारीरिक विकासामध्ये, किमान शैक्षणिक पातळी संधीमध्ये किंवा आवश्यक मनोरंजनामध्ये बाधा उत्पन्न होतेश.

खेळण्या बागडण्याच्या, शाळेत जाण्याच्या वयामध्ये मुलांचा शारीरिक विकास होत असतो. याच वयामध्ये जर त्यांना चार पैसे कमविण्यासाठी किंवा अन्य कारणाने श्रम किंवा मजुरी करावी लागत असेल तर त्याचा परिणाम शारीरिक, मानसिक विकासावर होतो. वयाच्या दहा वर्शेपर्यंत मेंदूचा, 14 वर्शेपर्यंत फुफुसाचा तर 17 वर्शेपर्यंत स्नायुंचा विकास होत असतो. नैसर्गिक होणा–या विकासामध्ये बाल वयात कराव्या लागणा–या कामामुळे बाधा उत्पन्न होते.

बालकामगारांचे स्वरूप –

भारतातील बालकामगारांपैकी 60.00 प्रतिशत पेक्षा जास्त कामगार हे वय वर्शे 10 पेक्षाही खालील आहेत. घरगुती स्वरूपाची मजुरी करणा–यांचे प्रमाण 36.00 प्रतिशत आहे. व्यापार – उद्योगात मजुरी करणा–यांचे प्रमाण 23.00 प्रतिशत आहे. मोठमोठया शहरात कचरापेटयातून काचा, कागद गोळा करणारी किंवा रेल्वेतून साफ सफाई, बुटपॉलीश इत्यादी किरकोळ काम करणा–या बालकामगारांची संख्या कुठेही नोंदलेली नाही, पण ती संख्या निश्चितच लक्षणिय आहे.

भारतात सर्व राज्यांमध्ये ग्रामीण तसेच शहरी विभागातही वेगवेगळे व्यवसाय, व्यापार, उद्योगधंदे, हॉटेल्स्, कारखाने, मळे, खाणी इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात बाल कामगार काम करत आहेत. आरोग्यास अपायकारक ठरणा–या परिस्थितीमध्ये खाणीत काम / मजुरी करणा–या मुलांना क्षय, दमा यासारख्या गंभीर रोगांना सामोरे जावे लागते. तामिळनाडूमधील शिवकाशी आणि रामानंदरपूरम जिल्हयामध्ये फटाक्याच्या तसेच आगपेटयाच्या कारखान्यात म्हणजे जेथे दारूगोळयाचा स्फोटकांचा उपयोग केला जातो अशा धोक्याच्या परिस्थितीही बाल कामगार काम करत असतात. अत्यंत प्रदुशित, विविध दुर्गंधीयुक्त धूर व धूळयुक्त हवा, यंत्राचा खडखडाट, पोटॅशियम किंवा असे तत्सम घातक रसायने हाताळणे, जेथे अगदी 1400 सेंटीग्रेड तापमान असते अशा भट्टीजवळ हे बालकामगार काम करतात. परिणामी त्यांना स्वरूपानुसार दमा, नेत्रविकार, ब्रॉकायटीस, पाठदुखी, डोकेदुखी यासारखे विकारही होतात.

साधारणपणे कनिश्ठ सामाजिक, आर्थिक कुटुंबात म्हणजे जेथे पुरेसे जेवण वेळच्या वेळी मिळू शकत नाही अशा कुटुंबातील ही मुले आपले घर सोडून मिळेत तेथे मिळेल ते काम स्विकारतात आणि मिळेत ते उत्पन्न आपल्या घरी देतात. कमीत कमी पगार देवून काम मात्र प्रौढ कामगाराइतके करून घेण्याची मालक वर्गाची निती असते. बालकामगारांना जरी कायद्याचे संरक्षण दिलेले असले तरी व्यवस्थापन वर्ग चलाखीने त्यातून पळवाट काढून आपल्यावर काही जबाबदारी पडणार नाही अशा पध्दतीने बालकामगारांना राबवतात. बहुतांश बालकामगार हे स्थलांतरीत असल्याने ते फुटपाथ, पाण्याच्या टाकीखाली, पुलाखाली, रेल्वे, बस स्थानके, सिमेंट पाईप, झोपडपट्टया थोडक्यात अमानव परिस्थितीत अत्यंत दयनीय अवस्थेत राहत असतात. जयपूर येथे असलेल्या फरशांच्या, मोरादाबाद येथे धातुकामाच्या, अलीगढ येथील कुलुपांच्या, जम्मु काश्मिरमधील गालीचे विणण्याच्या कारखान्यातून त्या त्या विभागातील मुले बहुसंख्येने काम करतात. तर पुणे – मुंबई येथील उपगारगृहातून तसेच घरगुती गडी म्हणून कोकणातील मुले काम करतात. या मुलांना दोन वेळचा चहा, नाश्ता आणि जेवण देवून दरमहा पाचशे रूपयांपासून हजार रूपयांपर्यंत पगार दिला जातो. वेगवेगळया महानगरांच्या बालकामगारांच्या केलेल्या पाहणीत असे आढळले की, सर्वात जास्त बालकामगारांची संख्या मुंबई महानगरीत आहे. सहाणपूर येथे लाकडाचे शिल्पकाम करणा–या उद्योगधंद्यात बालकामगारांकडून चौदा–चौदा तास काम अल्प वेतनात करून घेतले जाते. एकटया दिल्लीत धाबा, चहाच्या टप–या किंवा उपहारगृहातून रोजी तीस चाळीस रूपयांवर काम करणा–या मुलांची संख्या सत्तर हजारावर आहे. खाणकामगारांमध्ये काम करणा–या 15 वर्शाखालील मुलांची संख्या 56 प्रतिशत आहे.

सारांश –

चिखलाच्या गोळयाला आकार देवून त्यातून सुंदर मुर्ती घडवावी त्याप्रमाणे बालांचा किंवा बालकांचा सर्वांगीण विकास करून त्याला एक परिपूर्ण नागरीक बनविणे, या दृश्टीने प्रयत्न झाले पाहिजे. कोणतेही बाल भुकेलेले, निरक्षर किंवा आजारी राहू नये हे पाहण्याच्या दृश्टीने बालकांची व्यवस्था करण्याच्या आपल्या बांधीलकीचा पुनरूच्चार करण्याकरता बालकांसाठी एक राश्ट्रीय सनद भारत सरकारने 2003 मध्ये स्विकारली आहे. या सनदेमध्ये देखील संयुक्त राश्ट्रसंघाने केलेली बालकांविशयीची अभिसंधी व

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.I/ Feb; 2012

बालकांच्या मुलभूत कर्तव्याचे व हक्काचे संरक्षण करण्याच्या घटनात्मक तरतुदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आपली बांधीलकी, सरकारने स्विकारली आहे. मुलांना मोफत व सक्तीने शिक्षण देणे, बाल मजुरीच्या प्रथेचे निर्मुलन करून, सर्व प्रकारच्या पिळवणूकीपासून त्यांचे संरक्षण करणे, बालकांच्या शारीरिक, माणसिक व सामाजिक विकासाकरीता तरतुद करणे, त्यांच्या आरोग्याची व पोशक आहाराची काळजी घेणे व त्यांचे बालपण व्यवस्थितपणे जगता यावे म्हणून त्यांना सेवा व संधी उपलब्ध करून देण्याची तरतुद या सनदेमध्ये केली आहे. समाजाने सुध्दा अत्यंत संवेदनशीलतेने बालकांच्या विविध प्रश्नांकडे बघणे व ते सोडविण्याकरीता शासनाबरोबर कृतीशील सहभागी होणे आवश्यक आहे. असे झाले तरच देश बालमजुर मुक्त होवून त्यांना शिक्षण क्षेत्रात सामावून घेवू शकेल.

संदर्भ सूची –

1. मानवी हक्क व समाज – प्रा. नंदकुमार भारंबे
2. मानवी हक्क – विकास देशपांडे
3. मानवी हक्क संरक्षण – श्री.नी. सबनिस
4. मानवी हक्कांचा प्राचीण भारतीय अधिबंद – लेख – प्रा. अश्लेशा कुळकर्णी
5. विशेश आर्थिक क्षेत्र – सेझ – डॉ. विनायक गोवीलकर
6. सेझ आणि आजच्या विकसनशील देशातील औद्योगीकरणाचे प्रश्न – लेख – डॉ. श्रीनिवास खांदेवाले
7. सेझ, संकट की संधी – पुरूशोत्तम खेडेकर
8. आर्थिक जगत खंड 3 – डॉ. दि.व्य. जहागिरदार
9. बालकांचे कायदे – श्री.नी. सबनिस
10. भारतातील समकालीन सामाजिक समस्या – प्रा. माणिक माने
11. भारतीय सामाजिक समस्या – प्रा. भा. की. खडसे
12. भारतीय सामाजिक समस्या – प्रा. प्रदीप आगलावे
13. योजना मासिक
14. लोकराज्य मासिक

**Please cite this Article as :** *प्रा.डॉ. एस.टी. कुटे*, *'मानवी हक्क – सेझ आणि बालकामगार* **: Indian Streams research Journal (Feb ; 2012)**